

वसुंधरा सन्मान व वसुंधरामित्र पुरस्काराच्या वितरणप्रसंगी उपस्थित दिग्दर्शक संदीप सावंत, जगदीश गदगे, वीरेंद्र चित्राव, मकरंद देवधर यांच्यासमवेत पुरस्कारार्थी व्यक्ती व संस्थांचे पदाधिकारी.

# रामदास कोकरे यांना 'वसुंधरा सन्मान'

## किर्लोस्कर महोत्सव : निसर्ग मित्रमंडळाला 'वसुंधरामित्र'

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** घनकचऱ्याचे अचूक व्यवस्थापन करुन प्लॅस्टिकमुक्तीचा ध्यास घेऊन रत्नागिरीमधील दापोली अन् सिंधुदुर्गच्या वेंगुर्लामध्ये प्रेरणादायी पर्यावरणपूरक काम करणारे नगरपालिकेचे अधिकारी रामदास कोकरे यांना वसुंधरा सन्मान, तर नाशिकच्या निसर्ग मित्रमंडळाला वसुंधरामित्र पुरस्काराने गौरविण्यात आले.

निमित्त होते, किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे. या महोत्सवांतर्गत वसुंधरा संवर्धनासाठी उपयुक्त अशा पर्यावरणपूरक भरीव योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना वसुंधरा सन्मान आणि वसुंधरामित्र या पुरस्काराने दरवर्षी गौरविण्यात येते. हा पुरस्कार वितरण सोहळा गंगापूररोडवरील कुसुमाग्रज स्मारकमधील विशाखा सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून दिग्दर्शक संदीप सावंत, किर्लोस्करचे व्यवस्थापक जगदीश गदगे, महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, रामदास कोकरे, विजय सांबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

इंदिरानगर भागात काही मित्रांनी एकत्र येत स्थापन केलेला अनौपचारिक गट अर्थात निसर्ग मित्रमंडळाने पर्यावरणपूरक विविध उपक्रम हाती घेत यशस्वीपणे राबविले.

» उर्वरित / पान २ वर

### ...म्हणून गावाची नदी वाचवा

◆ आपल्या गावातून वाहणाऱ्या नदीचे संवर्धन न करता शहराच्या किंवा देशाच्या शाश्वत विकासाची कल्पना करणे हे अशक्य आहे. नद्या वाचवायच्या असतील तर काय करावे लागेल ते 'नदी वाहते' या सिनेमातून दाखविण्याचा प्रयत्न केला गेला असल्याचे चित्रपटाचे निर्माते संदीप सावंत यांनी यावेळी सांगितले.

# रामदास कोकरे यांना 'वसुंधरा सन्मान'

(पान १ वरून)

या मंडळाच्या सदस्यांना तसेच वीस वर्षांपासून संगमनेर तालुक्यात पारंपरिक बियाणांचे संवर्धन, डांगी गाय संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यामध्ये भरीव कामगिरी करणारे विजय सांबरे यांना आणि निसर्गप्रेमी व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणून निसर्गसंवर्धनाचे कार्य करणाऱ्या चातक नेचर कॉन्झर्वेशन सोसायटीच्या सदस्यांसह 'वसुंधरामित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले.